# महाराष्ट्र मेरीटाईम बोर्ड

# नागरीकांची सनद

# अनुक्रमणिका


| अ.क्र. | बाब | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|
| | प्रस्तावना | १-४ |
| १ | शासकीय व्यवस्थेत महाराष्ट्र मेरीटाईम बोर्डाचे स्थान | ५ |
| २ | महाराष्ट्र मेरीटाईम बोर्डाच्या अखत्यारितील बंदर समूह निहाय कार्यक्षेत्र | ६ |
| ३. | महाराष्ट्र मेरीटाईम बोर्डाची वैशिष्टये | ७ |
| ४. | महाराष्ट्र मेरीटाईम बोर्डाचे नागरीक | ८ |
| ५. | महाराष्ट्र मेरीटाईम बोर्डाच्या नागरीकांकडून असलेल्या अपेक्षा | ९ |
| ६. | महाराष्ट्र मेरीटाईम बोर्डाची उद्दीष्टये | १० |
| ७. | महाराष्ट्र मेरीटाईम बोर्डामार्फत नागरीकांना पुरविल्या जाणा-या सेवा | ११ |
| ८. | इनलॅण्ड व्हेसल्स ॲक्ट, १९१७ अंतर्गत जलयानांची नोंदणी | १२-१३ |
| ९. | मर्चंट शिपींग ॲक्ट, १९५८ अंतर्गत मासेमारी नौकांची नोंदणी | १४ |
| १०. | मर्चंट शिपींग ॲक्ट, १९५८ अंतर्गत मासेमारी नौकांच्या नोंदणीकरिता आवश्यक कागदपत्रे | १५ |
| ११. | महाराष्ट्र मेरीटाईम बोर्डामार्फत अंमलबजावणी करण्यात येत असलेले अधिनियम | १६ |
| १२. | बंदर विषयक पायाभूत सुविधा | १७-२६ |
| १३. | महाराष्ट्र मेरीटाईम बोर्डाची कार्यालये | २७-२८ |
| १४. | विविध अनुज्ञप्त्या मंजुर करण्यासाठी कालमर्यादा / सक्षम प्राधिकारी | २९-४३ |
| १५. | तक्रारनिवारण अधिकारी | ४४ |

# प्रस्तावना

महाराष्ट्र सागरी मंडळाची ( महाराष्ट्र मेरीटाईम बोर्ड ) नागरीक सनद प्रस्तूत करताना नागरीकांना विभागाविषयी माहिती असणे आवश्यक असल्याने विभागाची रचना व कार्य तसेच या विभागाकडून नागरिकांना पुरविण्यात येणा-या विविध सेवा, विभागाकडून अंमलबजावणी करण्यात येत असलेले अधिनियम आदी बाबींचा या सनदेमध्ये समावेश करण्यात आलेला आहे.

महाराष्ट्राला ७२० कि.मी.लांबीची किनारपटटी लाभलेली आहे. त्यापैकी अंदाजे बृहन्मुंबई ११४ कि.मी., ठाणे १२७ कि.मी., रायगड १२२ कि.मी., रत्नागिरी २३७ कि.मी. आणि सिंधूदूर्ग १२० कि.मी. अशी ही किनारपटटी पसरलेली आहे. या किनारपटटीशी संलग्न ४८ लहान बंदरे असून रत्नागिरी व रेडी ही दोन मध्यम स्वरुपाची बंदरे आहेत. या किनारपटटीच्या जवळून वाहणा-या नदया व खाडया या किनारपटटीला येऊन मिळतात. हा प्रदेशही अत्यंत दूर्गम व अवघड आहे. वाहतूकीसाठी दूर्गम भूप्रदेश असलेल्या भागातील वाहतूकीची गरज ही किनारपटटी पूर्ण करते. सन १९६० सालापर्यंत वेगळी अशी बंदर संघटना नव्हती. तोपर्यंत बंदराचा कार्यभार राज्य शासनाने भारत सरकारच्या अबकारी खात्याकडे एजन्सी पध्दतीने सोपविलेला होता. नंतर बंदर विकासासाठी जनतेच्या वाढत्या मागण्यांचा विचार करता राज्य सरकारने बंदर विभागाला वेगळा करण्याचा निर्णय घेतला व त्याप्रमाणे बंदर विभागासाठी दिनांक १ एप्रिल १९६३ मध्ये वेगळे कार्यालय स्थापन करुन तत्कालीन इमारती व दळणवळण खात्याच्या अधिपत्याखाली मुख्य बंदर अधिकारी यांचे अधिपत्याखाली त्याचा कार्यभार दिला. बंदर संघटनेची स्थापना ही बंदर विकासाच्या दृष्टीने त्यात अधिक सुधारणा, बंदराचा विकास करुन जहाज व जहाजे वहातुकीची गरज पूर्ण करण्यासाठी दळण वळणाबाबत परवाना देणे व संरक्षण करणे, आकारणे, वसुली इत्यादि तसेच नौकानयन विषयक कायदे व नियमांच्या वेगवेगळया तरतूदींची अमंलबजावणी इत्यादी करण्यासाठी महाराष्ट्र शासनाने केली होती.

बंदर संघटनेच्या कार्यामध्ये सुसुत्रता आणण्यासाठी शासनाने दिनांक ३१/८/१९९० च्या आदेशानुसार, दिनांक ३० जुन १९९० पासून बंदर विभागामध्ये विभाग प्रमुख म्हणून जल परिवहन आयुक्त असे भारतीय प्रशासकीय सेवेतील पद निर्माण केले होते व संघटनेतील (१) मुख्य बंदर अधिकारी, (२) जल आलेखक (३) सागरी अभियंता आणि चिफ सर्व्हेअर ही कार्यालये त्यांच्या अधिपत्याखाली आणण्यात आली होती.

राज्याच्या औद्योगिक व आर्थिक विकासाला चालना देण्यासाठी राज्य शासनाने लहान बंदराच्या विकासासाठी शिखर संस्था म्हणून महाराष्ट्र सागरी मंडळाची स्थापना करण्याचा निर्णय घेतला व त्याअनांगाने, महाराष्ट्र मेरीटाईम बोर्ड, अध्यादेश १९९६, दिनांक ४ ऑक्टोबर १९९६ रोजी घोषित करण्यात आला व शासन निर्णय क्रमांक ईपीटी-१०९६/प्र.क्र. १३३/परिवहन-५, दिनांक २२ नोंव्हेंबर १९९६ अन्वये, दिनांक २२ नोंव्हेंबर १९९६ पासून महाराष्ट्र मेरीटाईम बोर्ड कार्यान्वित झालेले आहे. बोर्डाचे एकूण १३ सदस्य असून मा. मंत्री (बंदरे) हे या बोर्डाचे पदसिध्द अध्यक्ष आहेत. सदस्यांमध्ये ५ सचिव, १ भारतीय नौसेनेचा प्रतिनिधी, सदस्य सचिव यांचा समावेश असून त्याव्यतिरिक्त, बोर्डाला व्यावसायिकता येण्यासाठी जल वहातूक/बंदर

काम, व्यवस्थापन, वित्तीय बाबी इत्यादी क्षेत्रातील तज्ञ बोर्डावर अशासकीय सदस्य म्हणून आहेत. महाराष्ट्र मेरीटाईम बोर्डाच्या स्थापनेनंतर पूर्वीच्या बंदर विभागातील जलपरिवहन आयुक्त, मुख्य बंदर अधिकारी, सागरी अभियंता व जल आलेखक हया कार्यालयांचा बोर्डात समावेश करण्यात आलेला आहे.

## *१.शासकीय व्यवस्थेत महाराष्ट्र मेरीटाईम बोर्डाचे स्थान*

महाराष्ट्र मेरीटाईम बोर्ड हे शासनाच्या गृह विभागाच्या प्रशासकीय नियंत्रणाखाली कार्यरत आहे

## *२. महाराष्ट्र मेरीटाईम बोर्डाच्या अखत्यारितील बंदर समूहनिहाय कार्यक्षेत्र*

केनारपटटीवरील ४८ लहान बंदराची खालीलप्रमाणे ५ बंदर समूहांमध्ये विभागणी करण्यात आली आहे. प्रत्येक संमूहांचे प्रभारी हे अधिकारी बंदर अधिकारी ( बंदर संरक्षक ) आहेत.

**बंदर समूह**

| **बान्द्रा बंदर समूह** | **मोरा बंदरे समूह** | **राजपुरी बंदर समूह** | **रत्नागिरी बंदर समूह** | **वेंगुर्ला बंदर समूह** |
|---|---|---|---|---|
| डहाणू | वसई | थळ (रेवस) | रत्नागिरी | पूर्णगड |
| तारापूर | कल्याण | अलिबाग (धरमतर) | वरोडा (तिवरी) | जैतापूर |
| नवापूर | भिंवडी | रेवदंडा | जयगड | विजयदूर्ग |
| सातपाटी | ठाणे | बोर्ली-मांडला | बोर्या | देवगड |
| केळवा (माहीम) | मोरा | नांदगांव | पालशेत | आचरा |
| अर्नाळा (दातिवरे) | करंजा | मुरुड-जंजिरा | दाभोळ | मालवण |
| उत्तन | मांडवा | राजपुरी (दिघी) | हर्णे | निवती |
| मनोरी | ट्रॉम्बे | मांदाड | केळशी | वेंगुर्ला |
| वर्सोवा | पनवेल (उल्वा बेलापूर) | कुंभारु | बाणकोट | रेडी |

### ***३.महाराष्ट्र मेरीटाईम बोर्डाची  वैशिष्टये***

- लोकाभिमुख प्रशासन

- प्राप्त अर्जांवर कालबध्द कार्यवाही करणे

- पारदर्शक कार्यपध्दतीचा अवलंब करणे व जनतेशी सलोखा ठेवणे

## ४.महाराष्ट्र मेरीटाईम बोर्डाचे  नागरिक

- बंदर क्षेत्रातील कार्यरत / बंदर क्षेत्राशी निगडीत कंपन्या
- प्रवासी बोटी धारक/ डेजर धारक
- जल वाहतूकीचा वापर करणारे प्रवासी
- मच्छिमार
- खाडया, बंदरातील गाळ काढणारे कंत्राटदार
- बंदर हद्दीतील जागा वापरणारे उद्योजक
- बंदर क्षेत्रात चित्रीकरण करणारे व्यावसायिक
- पोहण्याचा परवाना मागणा-या संस्था / खेळाडू

### *५.महाराष्ट्र मेरीटाईम बोर्डाच्या नागरीकांकडून असलेल्या अपेक्षा*

- राज्यातील बंदर विकासाचे धोरण लक्षात घेवून बंदर महसूला बाबतच्या नियमांचे पालन करुन महसूल वाढीमध्ये सहयोग देणे.
- प्रचलित नौकानयन नियमांचे पालन करणे.
- नौका नोंदणी शिवाय नौकेचे नौवहन न करणे.
- प्रवाशी बोटींचा प्रवासी परवान्यांचे विहित मुदतीत नोंदणी नुतनीकरण व सर्व्हे करुन घेणे.
- बंदर विकास योजनेला सहकार्य देणे.
- महाराष्ट्र मेरीटाईम बोर्डाचे बंदर विकासाचे धोरण लक्षात घेता व शासनाने या संदर्भात दिलेल्या सवलतीचा फायदा जास्तीत जास्त जनतेने घेवून राज्याच्या औद्योगिक प्रगतीला हातभार लावणे.

## ***६.महाराष्ट्र मेरीटाईम बोर्डाची उदिदष्टये***

- महाराष्ट्र मेरीटाईम बोर्डाच्या अखत्यारितील लहान बंदराचा विकास, नियंत्रण व व्यवस्थापन करणे.
- महाराष्ट्र मेरीटाईम बोर्डाच्या कार्यक्षेत्रातील खाडया, लहान बंदरालगतचे तसेच कोकण विभागातील नदयामध्ये जल आलेखन सर्व्हेक्षण व इतर संबंधित सर्व्हेक्षणे/अन्वेषणे करणे.
- सुलभ नौकानयनाकरिता सुविधा पुरविणे.
- सामुद्री लाटांमुळे होणारी किनारपट्टीची धूप टाळण्यासाठी धूपप्रतिबंधक बंधा-यांची कामे हाती घेणे व किनारपट्टीनजीकच्या लोकांच्या जिवीत व वित्तीय मालमत्तेचे संरक्षण करणे.
- विभागाच्या महसूल वाढीवर भर देणे.
- बेकायदेशीर नौकानयनास प्रतिबंध करुन त्यावर योग्य नियंत्रण ठेवणे.
- महाराष्ट्र राज्याला लाभलेल्या नैसर्गिक बंदराचा पुरेपुर उपयोग करणे.
- जल प्रवासी वाहतूकीला प्रोत्साहन देवून रस्ते व रेल्वे वाहतुकीवरील ताण कमी करणे.
- सेवा तत्परता हा दृष्टीकोन ठेवणे.
- जनतेच्या तक्रारीची दखल घेवून त्या त्वरित सोडविणे व त्यांचेशी सौजन्यशील संबंध ठेवणे.
- या विभागाशी संबंधित प्रमाणपत्रे/परवाने/ना हरकत दाखले देणे बाबत कालमर्यादेचे पालन करणे व जनतेस ती वेळेत मिळतील याची हमी देणे.
- विभागाचे अधिकारी विनम्र, सौजन्यशील, दृढनिश्चियी व गणवेष व ओळखपत्रानीशी कार्यालयीन वेळेत उपस्थित राहतील याची दक्षता घेणे.

## *७.महाराष्ट्र मेरीटाईम बोर्डामार्फत नागरिकांना पुरविल्या जाणा-या सेवा*

- हरितक्षेत्र बारमाही बंदरांच्या विकासासाठी शासनाच्या पूर्वमान्यतेने परवानगी देणे.
- जेटटी बांधकाम / वापरासाठी परवानगी देणे.
- जलप्रवासी वाहतूकीच्या ठिकाणच्या नौकानयन मार्गातील गाळ काढून तो सुरळीत ठेवणे.
- खाडया/ बंदरामध्ये जल आलेखन सर्व्हेक्षण करणे व त्याचे नकाशे इच्छुक व्यक्ती/कंपन्यांना उपलबध करुन देणे.
- सुलभ व सुरक्षित नौकानयनासाठी विविध सुविधा पुरविणे व त्यांची दुरुस्ती / देखभाल करणे.
- मच्छिमारी व प्रवासी बोटींची नोंदणी करणे.
- प्रवासी बोटीना प्रवासी वाहतुक परवाना देणे.
- बंदर कक्षेतील चित्रीकरणाला परवाना देणे.
- पोहण्याच्या शर्यतीतील स्पर्धकाना परवाना देणे.
- समुद्र धूप प्रतिबंधक कामे करणे.
- नौकानयनांचे नियमन करणे.
- कांही बंदर कक्षत्ा लागणारे पायलटेज करणे.
- इनलॅण्ड व्हेसल्स ऍक्ट, १९१७ अंतर्गत जलयानांचे सर्व्हेक्षण करुन सर्व्हे प्रमाणपत्र देणे.
- मासेमारी खुंटे व जाळी लावण्याची परवानगी देणे.

### *८.इनलॅण्ड व्हेसल्स ऍक्ट,१९१७ अंतर्गत जलयानांची नोंदणी*

शासनाने राज्यातील अंतर्गत जलयानांची इनलॅण्ड व्हेसल्स ऍक्ट,१९१७ अंतर्गत नोंदणी करण्याकरिता शासन अधिसूचना क्रमांक आयव्हीए ०८/२०००/सीआर-१३४/भाग-२/पीआरटी-१, दिनांक १५ जुन २००१ अन्वये मुंबई, ठाणे, मुरुड-जंजिरा, रत्नागिरी व वेंगुर्ला ही नोंदणीची ठिकाणे घोषित केली असून महाराष्ट्र मेरीटाईम बोर्डाचे बंदर अधिकारी, बान्द्रा, मोरा, राजपुरी (मुरुड-जंजिरा), रत्नागिरी व वेंगुर्ला यांना नोंदणी अधिकारी म्हणून घोषित केले आहे.

इनलॅण्ड व्हेसल्स ऍक्ट,१९१७ खाली जलयानांची नोंदणी करण्यासाठी सादर करावयाची कागदपत्रेः-

| अ.क्र. | बाब | पुरावा दर्शविणारी कागदपत्रे |
|---|---|---|
| १ | नाव आणि पूर्ण पत्ता | पुराव्या पृष्ठयर्थ रेशनकार्डाची छायाकिंत प्रत / अलिकडचे वीज देयक/वाहन चालक परवाना/पासपोर्ट इत्यादिपैकी एक व ३ पासपोर्ट साईज फोटो |
| २ | व्यवसाय | १) आयकर प्रमाणपत्र/ प्रतिज्ञापत्र (ऍफेडेव्हीट)<br>२) लेखापरिक्षांकाने तपासणी केलेले वित्तीय विवरणपत्र<br>३) स्थानिक पोलीस स्थानाकाकडील ना हरकत दाखला |
| ३ | सारंगाचे नांव<br>क्षमतेबददलचा दाखला | मूळ प्रमाणपत्राची साक्षाकिंत प्रत अर्जासोबत जोडावी व मूळ प्रमाणपत्र समक्ष दाखवून तपासून परत घ्यावे. |
| ४ | ज्या ठिकाणी नोंदणी करावयाची आहे त्या बंदराचे नाव | मूळ प्रमाणपत्र समक्ष सादर करावे. |
| ५ | जलयानांच्या मालकी हक्का पृष्ठयर्थ दस्तऐवज | विक्रीचा करारनामा/बांधणीचे प्रमाणपत्र |
| ६ | इंजिनाची बनावट आणि त्याचा क्रमांक | खरेदीची पावती, इंजिनचा क्रमांक असलेली खरेदीची पावती |
|  | संयुक्त मालकीच्या जलयानाबाबत | भागीदारीचा करारनामा/भागीदारांची नावे |

## ***९.मर्चन्ट शिपिंग ऍक्ट १९५८ अंतर्गत मासेमारी नौकांची नोंदणी***

केंद्र शासनाने मर्चन्ट शिपिंग ऍक्ट १९५८ अंतर्गत मासेमारी नौकांच्या नोंदणीकरिता खालील सूची मधील कोष्टक नंबर १ मध्ये नमूद केलेले बंदर हे भारतीय मासेमारी नौकेच्या नोंदणीसाठी जागा म्हणून आणि त्यासमोरील कोष्टक नंबर २ मध्ये नमूद केलेल्या अधिका-यांची नोंदणी अधिकारी म्हणून नियुक्ती केलेली आहे.

| बंदरे | अधिकारी |
|---|---|
| बान्द्रा | बंदर अधिकारी, बान्द्रा |
| मोरा | बंदर अधिकारी, मोरा |
| राजपुरी | बंदर अधिकारी,राजपुरी |
| रत्नागिरी | बंदर अधिकारी, रत्नागिरी |
| वेंगुर्ला | बंदर अधिकारी, वेंगुर्ला |

### *१०.मर्चन्ट शिपिंग ॲक्ट १९५८ अंतर्गत मासेमारी नौकांच्या नोंदणीकरिता आवश्यक कागदपत्रे*

१ मासेमारी नौकेचे नोंदणी करण्यासाठी अर्ज

२ तीन फोटो (मालकांचे)

३ मालकीबाबतचे प्रतिज्ञापत्र

४ इनव्हाईस / डिलीव्हरी चलन

५ इंजिनाची पावती / तपशील

६ शिफारस पत्र (मच्छिमार सोसायटीचे)

७ रेशनकार्डाची झेरॉक्स

८ सहाय्यक बंदर पर्यवेक्षक यांची शिफारस (बंदर कर इ.)

९ कर्ज घेतल्यास (बँक गहाण खत  किंवा मस्यव्यवसाय विभाग यांचे पत्र)

## ***११.महाराष्ट्र मेरीटाईम बार्डामार्फत अमंलबजावणी करण्यात येत असलेले अधिनियम***

- इंडियन पोर्टस् ऍक्ट -१९०८
- महाराष्ट्र मेरीटाईम बोर्ड ऍक्ट - १९९६
- मर्चन्ट शिपिंग ऍक्ट - १९५८
- महाराष्ट्र मायनर पोर्टस (पॅसेंजर व्हेसल्स ) रुल्स - १९६३
- इंनलॅण्ड व्हेसल ऍक्ट - १९१७
- महाराष्ट्र सागरी मासेमारी नियमन अधिनियम - १९८१
- बॉम्बे फेरीज ऍण्ड इनलॅण्ड व्हेसल ऍक्ट - १८६८

## *१२.बंदर विषयक पायाभूत सुविधा*

या मध्ये (१) हरितक्षेत्र बारमाही बंदरे (२) स्वनियंत्रित धक्के (३) बहूउददेशिय धक्के (४) महाराष्ट्र मेरीटाईम बोर्डाचे धक्के असे ४ प्रकार येतात. त्याचबरोबर, राज्यातील अंतर्गत जलवाहतूकीचा विकास याचाही यामध्ये समावेश होतो.

### (१) हरितक्षेत्र बारमाही बंदराच्या विकासाबाबतचे धोरण :-

कोकण किनारपट्टीवर होत असलेल्या औद्योगिक विकास लक्षात घेता बंदराना जास्तीत जास्त सुविधा उपलब्ध करुन देणे ही बाब अत्यंत गरजेची असल्याने शासनाने खाजगी क्षेत्राच्या सहभागाने राज्याच्या किनारपट्टीवरील ४८ बंदराचा विकास करण्याचे धोरण निश्चित केले आहे. त्याची ठळक वैशिष्ट्ये पुढील प्रमाणे आहेत. (शासन निर्णय दिनांक १५/३/१९९६,२८/११/२००० व २४/४/२००२)

- बांधा, मालकी, वापरा, सहभाग व हस्तांतरण या तत्वावर बंदराचा विकास. ५ वर्षाच्या बांधकाम कालावधीसह ५० वर्षाचा सवलत कालावधी.
- बंदर विकास प्रकल्पात राज्य शासनाचा ११ टक्क्यांपर्यंत समन्याय सहभाग.
- कंपनीच्या मंडळावर महाराष्ट्र सागरी मंडळाचे दोन संचालक नेमणे.
- सवलत करार नाम्यावरील नोंदणी फी व मुद्रांक शुल्काच्या प्रदानातून सूट.
- महाराष्ट्र सागरी मंडळाने सवलतीत धक्काभाडे आकारणे.
- नजीकच्या राष्ट्रीय महामार्गापर्यंत मार्गजोडणी महाराष्ट्र सागरी मंडळ/ राज्य शासनाने अंशत निधी देणे.
- बंदरावर पुरविण्यात येणा-या सेवांसाठी प्रशुल्क/दर निश्चित करण्याचे पूर्ण स्वातंत्र्य असणे.

**सद्यस्थितीत विकसीत होत असलेली बंदरे :**

(१) रेवस आवरे (२) दिघी (३) जयगड

(४) विजयदूर्ग (५) रेडी

**विकासासाठी उपलब्ध असलेली बंदरे :**

१. आलेवाडी

२. गणेशगुळे

**(२) स्वनियंत्रित धक्क्याच्या बांधकामाबाबतचे धोरण-**

लहान बंदरावर आधारीत उद्योग आणि सुविधा याकरिता स्वनियंत्रित धक्क्याच्या बांधकामासाठी राज्य शासनाची/बोर्डाची धोरणात्मक तत्वे खालील प्रमाणे आहेत. ( शासन निर्णय दिनांक २६.६.१९९५, १९.८.२००५,२३.११.२००५)

- बांधा वापरा व हस्तांतरीत करा या तत्त्वावर बांधकाम
- महाराष्ट्र मेरीटाईम बोर्डाशी करारनाम्याचा कालावधी ३० वर्षे राहील.
- राज्य शासन, धक्क्यांच्या ठिकाणी बोलावण्यात येणा-या जहाजांकडून धक्क्याचा आकार वसूल करणार नाही. तथापि, चढणावळ-उतरणावळ शुल्क, जहाजासंबंधीचे शुल्क आदी शासन/महाराष्ट्र मेरीटाईम बोर्डाकडून अधिसूचित दराने वसूल करण्यात येईल.
- बांधकाम, कार्यान्वयन आणि हस्तांतरण या तत्वानुसार ३० वर्षाच्या अखेरीस, सदर धक्का आणि धक्क्यावरील अतिरिक्त बांधकाम शासनाकडे परत देण्यात येईल.

**महाराष्ट्र राज्याच्या बंदर हद्दीत सध्या खालील स्वनियंत्रित धक्के कार्यरत आहेत.**

| अ.क्र. | बंदर | चालक कंपनी | मालाचा प्रकार |
|---|---|---|---|
| १. | पनवेल (उल्वा-बेलापूर) | गुजरात अंबुजा सिमेंट लि. | बल्क सिमेंट |
| २. | करंजा (धरमतर) | इस्पात इंडस्ट्रीज लि. | लोह माती, भाजलेल्या विटा, क्लिंकर, कोक/कोळसा, स्पाँज आयर्न |
| ३. | रेवदंडा | विक्रम इस्पात लि. | लोह माती/पॅलेटस्/फाईन, हॉट ब्रिकेटेड आयर्न, डायरेक्ट रिडयूस्ड आयर्न |
| ४. | दाभोळ | रत्नागिरी गॅस ऍन्ड पॉवर प्रा.लि. | नाप्था, हाय स्पीड डिझेल |
| ५. | रत्नागिरी (पावस-रनपार) | फिनोलेक्स इंडस्ट्रीज लि. | इथिलीन डाय-क्लोराईड एलपीजी |

### (३) बहुउद्देशिय टर्मिनलच्या बांधकामाबाबतचे धोरण-

एखाद्या हरितक्षेत्र बंदराच्या किंवा स्वनियंत्रित धक्क्याच्या तुलनेत कमी गुंतवणूक व अल्प भरण (जेस्टेशन) कालावधी आवश्यक असणा-या बहुउद्देशिय टर्मिनलबाबतचे धोरण शासन निर्णय दि. १९.८.२००५ अन्वये निर्गमित करण्यात आले आहे. प्रमुख धोरणात्मक वैशिष्टये पुढीलप्रमाणे आहेत.

- बांधा, वापरा, मालकी व हस्तांतरण या तत्वावर विकास.
- ३० वर्षांचा करारनामा कालावधी
- शासन/महाराष्ट्र मेरीटाईम बोर्ड वेळोवेळी विनिर्दीष्ट करील अशा स्वनियंत्रित धक्क्याच्या दराच्या दीडपट दराने चढणावळ/उतरणावळ शुल्काची आकारणी
- नौकानयन मार्गातील गाळ उपसणीसह आधारभूत पायाभूत सुविधांचा विकास करण्याची व नौकानयन साधनांची तरतूद करण्याची विकासकाची संपूर्ण जबाबदारी

### (४) महाराष्ट्र मेरीटाईम बोर्डाच्या धक्क्याबाबतचे धोरण-

महाराष्ट्र मेरीटाईम बोर्डाच्या मालकीच्या धक्क्यांचा मालहाताळणीसाठी वापर करण्याची उद्योजक कंपन्यांनी तयारी दर्शविल्यास, कंपनीच्या प्रस्तावाच्या सविस्तर अभ्यासांती, संबंधित उद्योजक कंपनी व महाराष्ट्र मेरीटाईम बोर्ड यांच्यामध्ये परस्परसंमत अटी/शर्तींचा अंतर्भाव असलेला करारनामा स्वाक्षांकित करण्यात येतो. मालहाताळणीसाठीचे संबंधित शुल्क विहीत शासन/महाराष्ट्र मेरीटाईम बोर्डाव्दारे अधिसूचित दराप्रमाणे करण्यात येते.

### (५) केंद्र पुरस्कृत योजनेअंतर्गत अंतर्गत जलवाहतूकीचा विकास-

संपूर्ण महाराष्ट्रात खाडया, नद्या, अनेक तळी व कालव्यांमध्ये देशांतर्गत जलवाहतूकीच्या संधी उपलब्ध आहेत. देशातील अंतर्गत जलवाहतूकीला चालना देण्यासाठी केंद्र शासनाकडून केंद्र पुरस्कृत योजनेअंतर्गत किनारी राज्यांना ९० टक्के अर्थसहाय्य देण्यात येते व उर्वरित १० टक्के निधी संबंधित राज्य शासनाने उभारावयाचा आहे.

हया योजनेअंतर्गत, महाराष्ट्र राज्याकरिता सन २००३-०४ व २००४-०५ मध्ये खालीलप्रमाणे एकूण ८ प्रकल्प मंजूर झाले आहेत.

१. गोदावरी नदीमध्ये विष्णुपुरी, जि. नांदेड

२. दक्षिण मुंबईपासून अंबा नदी/धरमतर खाडीमध्ये, मांडवा

३. दक्षिण मुंबईपासून अंबा नदी/धरमतर खाडीमध्ये, करंजा

४. म्हसळा/मांदाड नदीमध्ये (राजपुरी खाडी) राजपुरी

५. म्हसळा/मांदाड नदीमध्ये (राजपुरी खाडी) दिघी

६. म्हसळा/मांदाड नदीमध्ये (राजपुरी खाडी) जंजिरा किल्ला

७.	म्हसळा/मांदाड नदीमध्ये (राजपुरी खाडी) आगरदांडा

८.	इसापूर जि. नांदेड

**(६)	<u>मुंबईच्या सभोवताली विकसित होत असलेले प्रवासी जलवाहतूक प्रकल्प-</u>**

| मार्ग | पासून | पर्यंत |
|---|---|---|
| पश्चिम सागरी मार्ग | नरिमन पॉईंट | बोरीवली |
| पूर्व सागरी मार्ग | दक्षिण मुंबई/गेटवे ऑफ इंडिया | ठाणे/नवी मुंबई |
| क्रॉस हार्बर मार्ग | गेटवे ऑफ इंडिया / फेरी व्हार्फ (तरी धक्का) / दक्षिण मुंबई | मांडवा इ रेवस, जे.एन.पी.टी.एलिफंटा |

- देशांतर्गत जल वाहतुकीचे जाळे बांन्द्रा,जुहू व वर्सोवा मार्ग समाविष्ट असणा-या पश्चिम सागरी मार्गावरील नरीमन पॉईट ते बोरीवली असे संकल्पित केले आहे.
- नरिमन पॉईट (एनसीपीए जवळ) बांन्द्रा,जुहू चौपाटी, वर्सोवा,एरंगळ, मार्वे व बोरीवली या अन्य जागा विचारात घेण्यात येणार आहेत.
- यासाठी महाराष्ट्र रस्ते विकास महामंडळास कार्यान्वयन अभिकरण म्हणून नियुक्त करण्यात आले आहे.
- पूर्व सागरी मार्ग व क्रॉस हार्बर मार्ग या अन्य दोन मार्गाना अगोदरच पासधारी (कम्प्यूटर) फेरी यंत्रणा म्हणून प्रस्तापित केली आहे. तथापि, त्यास अत्याधुनिक बनविण्यासाठी जागांमधील सुधारणा, पायाभूत सुविधांची निर्मिती इत्यादिंचा तपशील तयार करण्यात येत आहे.
- पूर्व सागरी मार्गाचा विकास करण्यासाठी एस.पी.व्ही.ची नोंदणी देखील करण्यात आली आहे.

**इतर सुविधाः-**

सागरी किनारपट्टीचा इतर विविध कार्यक्रमांसाठी पध्दतशीरपणे वापर करण्यास उत्तेजन देण्यासाठी अवशिष्ट धोरण तयार करण्यात आले आहे.

सुविधांचे प्रवर्गः-

- जलक्रिडा, सागरी संग्रहालय, मत्स्यालय, सागरी विषय उद्याने इ. सारखे मनोरंजनपर कार्यक्रम.
- पर्यटक, खेळाडू इ.साठी प्रवासी जलवहातूक.
- खाजगी निवासी परिवास्तूंमध्ये  शिरकांव.
- सागरी शिक्षण व संशोधन कार्यक्रम.

## प्रमुख धोरणात्मक वैशिष्टये :

- खाजगी व सार्वजनिक हिताच्या दृष्टीने वर्गीकरण करावयाच्या आणि स्वतंत्र नियत वाटप / विकास विषयक मार्गदर्शकतत्वांमध्ये वर्गीकृत करावयाचा विकास.
- सर्व प्रवर्गासाठी १० वर्ष इतका कमाल भाडेपटटयाचा कालावधी असणे.
- एकदाच भरावयाची ना-परतावा नाममात्र लायसन फी, दरवर्षी प्रदान करावयाचा भाडेपटटयाचा दर.
- अनुज्ञेय असलेल्या लायसन फी इतक्या हस्तांतरण फीचे प्रदान केल्यावर भाडेपटटा हक्क हस्तांतरण योग्य आहेत.
- लवचिक संरचना अधिमान्य करणे.
- प्रत्यक्ष संरचनांचे संकल्पचित्र व विकास प्रमाणित करण्यासाठी महाराष्ट्र सागरी मंडळाचे नामीका प्रविष्ट संमंत्रक.
- शासकीय / निमशासकीय संघटनांसाठी ५० टक्क्यांपर्यंत फी मध्ये सवलत.
- १० वर्षाच्या भाडेपटटयांची मुदत समाप्त झाल्यावर, स्थावर मालमत्ता, महाराष्ट्र सागरी मंडळाकडे निहीत होईल.
- अधिमान्य पुर्नवाटप आणि आवश्यक कर्तव्य करण्यास नकार देण्याचा पहिला हक्क.

## जल आलेखन सर्व्हेक्षण-

महाराष्ट्र मेरीटाईम बोर्डामध्ये जल आलेखक यांचे नियंत्रणाखाली जलआलेखकन सर्वेक्षण विभाग कार्यरत असून या विभागाकडून विविध प्रकल्पांचे नियोजन व अंमलबजावणी  करण्यासाठी समुद्राच्या खोली विषयीची माहिती पुरविण्यात येते. तसेच सागरी किनारा नियमन प्रक्षेत्र नियमान्वये नौकानयन सुरक्षा, बंदरांचा विकास व भरतीची उच्चतम/न्यूनतम रेषा आखण्यासंबंधी सर्वेक्षणाचे काम हाती घेतले जाते.  या विभागाकडे ९३८ पेक्षा अधिक समुद्र खोली विषयक नकाशे असलेला माहितीचा साठा आहे.  जलमार्गाचा वापर करणा-यांना हे नकाशे विहीत रक्कम विभागात भरणा केल्यानंतर उपलब्ध करुन देण्यात येतात.

त्याचप्रमाणे, जलआलेखन सर्वेक्षण विभागाकडून लहान बंदरांतील भरती ओहोटीचे कोष्टक प्रसिद्ध करण्यात येते. या कोष्टकामध्ये दैनदिन भरती/ओहोटीच्या वेळा आणि लाटांची उंची यांचे अंदाज दिलेले असतात.

**सागरी अभियंता आणि चिफ सर्व्हेअर :- गाळ उपसणी,नौकानयन, आय.व्ही.ऍक्ट १९१७**

गाळ उपसणी:- सागरी जलमार्गामध्ये नैसर्गिक प्रक्रियेमुळे साचणा-या गाळामुळे नौकानयनास आवश्यक खोली उपलब्ध होत नाही. त्यामुळे सदर ठिकाणचा गाळ उपसणे व जलमार्ग सागरी प्रवासी व माल वाहतूकीसाठी नौकानयनासाठी आवश्यक खोली उपलब्ध करणेसाठी सागरी अभियंता यांचे कडील ड्रेजींग युनिट व कर्मचारी कार्यरत असतात. गाळ उपसणीचे काम उघाडीच्या हंगामात म्हणजे १५ सप्टेंबर ते २५ मे पर्यंत दरवर्षीच्या मंजुर कार्यक्रमाप्रमाणे आवश्यक त्या ठिकाणी करण्यात येते. सन १९९६ पासून शासनाकडून कॅपिटल ड्रेजींगसाठी स्वतंत्र निधी उपलब्ध करुन घेवून निविदा प्रक्रिया पूर्ण करुन खाजगी ठेकेदारांकडून मोठया प्रमाणात गाळ उपसणीचे उद्दिष्ट सागरी अभियंता यांचे कार्यालयाकडून साध्य करण्यात येते.

नौकानयन सुविधा :- अंतर्गत डहाणू ते किरणपाणी पर्यंतच्या सागरी किनारपटटीवर ४५ नौकानयन दिवे मच्छिमार व सागरी नौकाच्या मार्गदर्शनासाठी लावण्यांत आलेले आहेत. नौकानयन दिवे हे पूर्वी गॅस व विजेवर कार्यान्वित ठेवण्यात येत होते. परंतु आता सौर उर्जेवर चालणारे सौर दिवे बसविण्याची कार्यवाही या विभागाकडून पूर्ण झाली आहे.

इनलॅण्ड व्हेसल ऍक्ट, १९१७:- मे, २००० पासून इनलॅण्ड व्हेसल ऍक्ट, १९१७ अंतर्गत महाराष्ट्रात नोंदणी झालेल्या जलयानाची वार्षिक तपासणी करण्यांचे काम सागरी अभियंता यांचेकडे सोपविण्यांत आलेले आहे. या अंतर्गत अंदाजे ७५० जलयानाची तपासणी करण्यांचे व प्रमाणपत्र देण्यांचे काम सागरी अभियंता करीत आहेत.

***इनलॅण्ड व्हेसल्स ऍक्ट १९१७ अंतर्गत जलयानाचा सर्व्हे करण्यासाठी आवश्यक कागदपत्रे***

(१) जलयानाचे ड्राईंग, प्लॅन, स्टॅबिलिटी, इन्क्लायनिंग रिपोर्ट

(२) जलयान मालकाचे डिक्लरेशन फॉर्म.

(३) सर्व्हेअरकडील सर्वे रिपोर्ट (अंतिम प्रमाणपत्र अदा करण्यासाठी)

(४) मागील सर्वे प्रमाणपत्राची प्रत.

(५) नोंदणी प्रमाणपत्राची प्रत.

(६) बॉयंट ऍप्रेटसची प्रत (वैध कालावधीची)

(७) फायर फायटींग इक्युपमेंटची छायांकीत प्रत (वैध कालावधीची)

(८) महाराष्ट्र राज्यात वैध असलेले सारंग/मास्टर याच्या प्रमाणपत्राची प्रत.

(९) इंजिन ड्रायव्हर प्रमाणपत्राची प्रत

(१०) सर्व्हेअरने दिलेल्या कामांचा पूर्तता अहवाल

**महाराष्ट्र मेरीटाईम बोर्डामार्फत हाती घेण्यात येणारी स्थापत्यविषयक अभियांत्रिकी कामेः-**

महाराष्ट्राच्या किनारपट्टीवरील काही ठिकाणी समुद्राच्या जोरदार तुफानी लाटांमुळे किनारपट्टीची धूप होऊन नजीकच्या लोकवस्तीस धोका संभवतो. अशा धूपप्रवण क्षेत्रात होणारी धूप थांबविण्यासाठी तेथील परिस्थितीची पाहणी करुन समुद्र धूप प्रतिबंधक बंधारे बांधण्याबाबत निर्णय घेण्यात येतो. तसेच धूप प्रतिबंधक बंधारे बांधण्याच्या कामांची अंदाजपत्रके किनारी अभियंता, मुंबई यांच्याकडून तयार करवून घेऊन त्यांना प्रशासकीय मान्यता देण्यात येते व शासनाकडून निधी उपलब्ध झाल्यावर त्यांच्यामार्फत कामे हाती घेऊन पूर्ण करण्यात येतात.

जलवहातुकीस योग्य असलेल्या ठिकाणी जलवहातुकीसाठी धक्के, जोडरस्ते, प्रवासी निवारे, पाणीपुरवठा इत्यादीची सोय करण्यात येते.

तसेच, जलवहातुक सुरक्षित होण्याकरिता आवश्यक त्या ठिकाणी मार्गदर्शक दिवे, बोये इत्यादी सुविधा बंदरात पुरविण्यात येतात.

## *१३.महाराष्ट्र मेरीटाईम बोर्डाची कार्यालये*

| Dा.क्र. | कार्यालयाचे नांव व पत्ता | दूरध्वनी क्रमांक | फॅक्स क्रमांक |
|---|---|---|---|
| १ | मुख्यालय-<br>मुख्य कार्यकारी अधिकारी ,<br>महाराष्ट्र मेरीटाईम बोर्ड,<br>इंडियन मर्कन्टाईल चेंबर्स,<br>३रा मजला, बॅलार्ड इस्टेट,<br>मुंबई - ४०० ००१ | २२६५ ८३७५<br>२२६९ २४०९<br>२२६१ २१४३ | २२६१ ४३३१ |
| २ | मुख्य बंदर अधिकारी ,<br>महाराष्ट्र मेरीटाईम बोर्ड,<br>इंडियन मर्कन्टाईल चेंबर्स,<br>३रा मजला, बॅलार्ड इस्टेट,<br>मुंबई - ४०० ००१ | २२६१५४५७ | २२६१ ४३३१ |
| २ | जल आलेखक,<br>महाराष्ट्र मेरीटाईम बोर्ड,<br>गोविंद पाटील मार्ग, खारदांडा,<br>बांद्रा (प),<br>मुंबई- ४०० ०५२. | २६०४ ५७०२ | २६०४ ४२७४ |
| ३ | सागरी अभियंता,<br>महाराष्ट्र मेरीटाईम बोर्ड,<br>दादाभाई रोड,भवन्स कॉलेज<br>समार, अंधेरी (प),<br>मुंबई - ४०० ०५८ | २६२३ ९९४५ | २६२३ ११२५ |
| ४ | बंदर अधिकारी,<br>बांद्रा बंदरे समूह,<br>गोविंद पाटील मार्ग,खारदांडा,<br>बान्द्रा ( प ),मुंबई - ४०० ०५२ | २६४९ ०८ ७३ | २६४९ ०८७३ |
| ५ | बंदर अधिकारी, मांरा बंदरं समूह, चेंदणी कोळीवाडा,<br>मिठ बंदर रोड,<br>ठाणे (पूर्व) | २५४२ ८४४५ | २५४२ ८४४५ |
| ६ | बंदर अधिकारी,<br>राजपुरी बंदरे समूह,<br>भाजी मार्केट मार्ग, अलिबाग,<br>जि.रायगड. | ९५२१४१-२२२७४६ | ९५२१४१-२२२७४६ |
| ७ | बंदर अधिकारी,<br>रत्नागिरी बंदरे समूह,<br>मांडवी, ता.जि. रत्नागिरी. | ९५२३५२-२२२१६० | ९५२३५२-२२२१६० |
| ८ | बंदर अधिकारी,<br>वेंगुर्ला बंदरे समूह,<br>साळगांवकर बिल्डिंग,<br>घर नंबर -३२,<br>परुळेकर गल्ली, ता.वेंगुर्ला,<br>जि.सिंधूदुर्ग -४१६५१६ | ९५२३६६-२६२०७७ | ९५२३६६-२६२०७७ |

# *नागरीकांच्या विविध मागण्यांचा निपटारा करण्यासाठी लागणारी कालमर्यादा*

| अ.क्र | कार्यालयाकडून/विभागाकडून पुरविण्यात येणारी सेवा (कोणत्या धोरण/अधिनियमान्वये) | प्रकरणाचा निपटारा करण्यासाठी नेमूण दिलेले अधिकारी /प्राधिकरण | आवश्यक कागदपत्रांची पूर्तता केल्यानंतर प्रकरण निकाली काढण्यासाठी लागणारा अवधी | प्रकरणांचा विहित मुदतीत निपटारा न झाल्यास अपीलीय प्राधिकरण | अपीलीय प्राधिकरणास न्याय निवाडा करण्यास लागणारा अवधी |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| १. | **हरितक्षेत्र बारमाही बंदर विकसित करण्यासाठी परवाना** (हरितक्षेत्र बारमाही बंदर विकासाचे धोरण) | मुख्य कार्यकारी अधिकारी | १. मुख्य कार्यकारी अधिकारी कार्यालयात अर्ज प्राप्त झाल्यानंतर प्रकरणाची छाननी करुन प्रकरण दोन महिन्याच्या आंत बोर्डाच्या मान्यतेसाठी ठेवावे.<br>२. बोर्डाच्या मान्यतेअंती, सदर प्रकरणावर कार्यवाही करुन शासनाकडे प्रस्ताव सादर करावा.<br>(परिपूर्ण प्रस्ताव प्राप्त झाल्यापासून एकंदर कालावधी ३ महिने) | शासन, गृहविभाग | - |
| २ | **स्वनियंत्रित धक्का वापरासाठी लागणारा परवाना** (स्वनियंत्रित धक्क्याबाबतचे धोरण व महाराष्ट्र मेरीटाईम बोर्ड ऍक्ट १९९६ च्या कलम ३५ अंतर्गत) | मुख्य कार्यकारी अधिकारी | १. मुख्य कार्यकारी अधिकारी कार्यालयात अर्ज प्राप्त झाल्यानंतर प्रकरणाची छाननी करुन प्रकरण दोन महिन्याच्या आंत बोर्डाच्या मान्यतेसाठी ठेवावे.<br>२. बोर्डाच्या मान्यतेअंती, सदर प्रकरणावर कार्यवाही करुन शासनाकडे प्रस्ताव सादर करावा.<br>(परिपूर्ण प्रस्ताव प्राप्त झाल्यापासून एकंदर कालावधी ३ महिने) | शासन, गृहविभाग | - |
| ३ | **बंदर किना-या लगतच्या जागा वापरासाठी ना हरकत दाखला** (इंडियन पोर्टस् ऍक्ट, १९०८ व महाराष्ट्र मेरीटाईम बोर्ड ऍक्ट १९९७ च्या कलम २४ अंतर्गत) | महाराष्ट्र मेरीटाईम बोर्ड/ मुख्य कार्यकारी अधिकारी | १. बंदर सरंक्षक कार्यालयात अर्ज प्राप्त झ ाल्यानंतर प्रकरणाची छाननी करुन प्रकरण एक महिन्याच्या आंत मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे मान्यतेसाठी सादर करावे.<br>२. मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी सदर प्रकरणावर कार्यवाही करुन एक ते दोन महिन्यात निर्णय प्रक्रिया पूर्ण करावी. | महाराष्ट्र मेरीटाईम बोर्ड नियमाप्रमाणे मु.का.अ.यांचे नांवे अर्ज करणे जरुरी असल्यामुळे ही पध्दत योग्य आहे. | एक महिना |
| ४ | **प्रवासी वाहतूक अनुज्ञप्ती** (इंडियन पोर्ट ऍक्ट १९०८ कलम ६ के अन्वये व पॅसेंजर व्हेसल रुल्स १९६३ च्या कलम ३ अंतर्गत तसेच महाराष्ट्र मेरीटाईम बोर्ड ऍक्ट १९९६ च्या अधिन राहून) | बंदर संरक्षक | १. सहाय्यक बंदर निरीक्षकाकडे अर्ज प्राप्त झाल्यानंतर त्यांनी एक आठवडयाच्या आंत बंदर अधिकारी यांना अर्ज सादर करावा.<br>२. बंदर सरंक्षक यांनी सदर प्रकरणावरील निर्णय प्रक्रिया दोन आठवडयात करावी. | मुख्य बंदर अधिकारी, महाराष्ट्र मेरीटाईम बोर्ड,मुंबई | २ आठवडे |
| ५ | **प्रवासी वाहतूक अनुज्ञप्तीचे नूतनीकरण**<br><br>(इंडियन पोर्ट ऍक्ट १९०८ कलम ६ के अन्वये व पॅसेंजर व्हेसल रुल्स १९६३ च्या कलम ३ अंतर्गत तसेच महाराष्ट्र मेरीटाईम | बंदर संरक्षक | १. सहाय्यक बंदर निरीक्षकाकडे अर्ज प्राप्त झाल्यानंतर त्यांनी एक आठवडयाच्या आंत बंदर अधिकारी यांना अर्ज शिफारशीसह सादर करावा.<br>२. बंदर सरंक्षक यांनी सदर | मुख्य बंदर अधिकारी, महाराष्ट्र मेरीटाईम बोर्ड,मुंबई | २ आठवडे |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | बोर्ड ऍक्ट १९९६ च्या अधिन राहून) | | प्रकरणावरील निर्णय प्रक्रिया दोन आठवडयात करावी. | | |
| ६ | **मासेमारीसाठी खूंटे रोवण्याची परवाने**<br><br>डिपार्टमेंव्टल इंस्ट्रक्शन कस्टम ऍण्ड सेन्ट्रल एक्साईज कलम २४ (ए,बी,सी) अन्वये<br>(महाराष्ट्र मेरीटाईम बोर्ड ऍक्ट १९९६ च्या अधिन राहून) | बंदर संरक्षक | **१**. सहाय्यक बंदर निरीक्षकांकडे अर्ज प्राप्त झाल्यानंतर त्यांनी एक आठवडयाच्या आंत बंदर अधिकारी यांना अर्ज सादर करावा.<br>**२**. बंदर सरंक्षक यांनी सदर प्रकरणावरील निर्णय प्रक्रिया ८ ते १० दिवसांत करावी. | मुख्य बंदर अधिकारी, महाराष्ट्र मेरीटाईम बोर्ड,मुंबई | २ आठवडे |
| ७ | **मासेमारीसाठी खूंटे/बोयास रोवण्यासाठी परवान्याचे नूतनीकरण**<br><br>डिपार्टमेंव्टल इंस्ट्रक्शन कस्टम ऍण्ड सेन्ट्रल एक्साईज कलम २४(ए,बी,सी) अन्वये<br>(महाराष्ट्र मेरीटाईम बोर्ड ऍक्ट १९९६ च्या अधिन राहून) | बंदर संरक्षक | **१**. सहाय्यक बंदर निरीक्षकाकडे अर्ज प्राप्त झाल्यानंतर त्यांनी एक आठवडयाच्या आंत बंदर अधिकारी यांना अर्ज शिफारशीसह सादर करावा.<br>**२**. बंदर सरंक्षक यांनी सदर प्रकरणावरील निर्णय प्रक्रिया दोन आठवडयात करावी. | मुख्य बंदर अधिकारी, महाराष्ट्र मेरीटाईम बोर्ड,मुंबई | १ आठवडे |
| ८ | **बंदरातून निर्गमन होणा-या जहाजांना बंदर निपटारा देणे.**<br>(इंडियन पोर्ट ऍक्ट १९०८ च्या कलम ४३ अन्वये व<br>महाराष्ट्र मेरीटाईम बोर्ड ऍक्ट १९९६ च्या अधिन राहून) | सहाय्यक बंदर निरीक्षक | तात्काळ | मागणी केल्यानंतर लगेच | १ आठवडा |
| ९ | **बंदर हदिदतील किनारी जागांवर जलयांनातून आयात/निर्यात होणा-या मालाच्या साठवूणूकीसाठी जागा वापरास परवानगी**<br><br>(महाराष्ट्र मेरीटाईम बोर्ड ऍक्ट १९९६ च्या कलम २७ व ३२ अन्वये) | मुख्य कार्यकारी अधिकारी | एक आठवडयांच्या आंत प्रकरणावरील निर्णय प्रक्रिया पूर्ण करावी. | अध्यक्ष महाराष्ट्र मेरीटाईम बोर्ड | २ आठवडे |
| १० | **बंदरात आगमन होणा-या प्रवासी माल वाहतूक बोटींना धक्का वापरास परवानगी**<br><br>इंडियन पोर्ट ऍक्ट १९०८ च्या कलम २५ अन्वये<br>(महाराष्ट्र मेरीटाईम बोर्ड ऍक्ट १९९७ च्या अधिन राहून) | मुख्य कार्यकारी अधिकारी | बंदर सरंक्षक यांच्याकडून अर्ज प्राप्त झाल्यानंतर १५ ते २० दिवसांत निर्णय प्रक्रिया पूर्ण करावी | महाराष्ट्र मेरीटाईम बोर्ड | १ आठवडा |
| ११ | **बंदर हदिदतील छायाचित्रीकरण करण्यासाठी परवाना**<br>इंडियन पोर्ट ऍक्ट १९०८ कलम ६ (१)जेजे अन्वये तसेच महाराष्ट्र मेरीटाईम बोर्ड ऍक्ट १९९६ च्या अधिन राहून) | बंदर संरक्षक | अर्ज प्राप्त झाल्यानंतर ८ ते १० दिवसांत निर्णय प्रक्रिया पूर्ण करावी | मुख्य बंदर अधिकारी | १ आठवडा |
| १२ | **मत्स्यनौका नोंदणी प्रकरणे (नविन नोंदणी/मालकी हक्क बंददल/नोंदणी नंबर बदल)**<br>मर्चन्ट शिपिंग ऍक्ट १९५८ च्या कलम ४३५ -जी,ओ अन्वये<br>(महाराष्ट्र मेरीटाईम बोर्ड ऍक्ट १९९६ च्या अधिन राहून) | बंदर संरक्षक | अर्ज प्राप्त झाल्यानंतर ८ ते १० दिवसांत निर्णय प्रक्रिया पूर्ण करावी | मुख्य बंदर अधिकारी | २ आठवडे |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १३ | **इनलॅण्ड व्हेसल ॲक्ट १९१७ अंतर्गत जलयान नोंदणी**<br>इंनलॅण्ड व्हेसल ॲक्ट १९१७ च्या कलम १९ फ अन्वये.<br>(महाराष्ट्र मेरीटाईम बोर्ड ॲक्ट १९९६ च्या अधिन राहून) | बंदर संरक्षक | अर्ज प्राप्त झाल्यानंतर ८ ते १० दिवसांत निर्णय प्रक्रिया पूर्ण करावी | मुख्य कार्यकारी अधिकारी | २ आठवडे |
| १४ | **इनलॅण्ड व्हेसल ॲक्ट १९१७ च्या नियम ९ अंतर्गत जलयानाचे सर्व्हेक्षण**<br>(महाराष्ट्र मेरीटाईम बोर्ड ॲक्ट १९९६ च्या अधिन राहून) | मुख्य कार्यकारी अधिकारी | सागरी अभियंता यांच्याकडे अर्ज प्राप्त झाल्यानंतर त्यांनी १५ दिवसांच्या आंत निर्णय प्रक्रिया पूर्ण करावी | महाराष्ट्र मेरीटाईम बोर्ड | १ आठवडा |
| १५ | **पोहण्याचा परवाना**<br>(महाराष्ट्र मेरीटाईम बोर्ड ॲक्ट १९९६ च्या अधिन राहून) | बंदर संरक्षक | बंदर सरंक्षक यांच्याकडे अर्ज प्राप्त झाल्यानंतर एक आठवडयाचे आंत निर्णय प्रक्रिया पूर्ण करावी | मुख्य बंदर अधिकारी | २ आठवडे |
| १६ | **महाराष्ट्र सागरी मासेमारी अधिनियम १९८१ च्या कलम ९ अंतर्गत मच्छिमारी बोटींची नोंदणी**<br>(महाराष्ट्र मेरीटाईम बोर्ड ॲक्ट १९९६ च्या अधिन राहून) | बंदर संरक्षक | बंदर सरंक्षक यांच्याकडे अर्ज प्राप्त झाल्यानंतर एक आठवडयाचे आंत निर्णय प्रक्रिया पूर्ण करावी | मुख्य बंदर अधिकारी | १ आठवडा |
| १७ | **उच्चत्तम भरती रेषा आखणीचे प्रमाणपत्र**<br>(महाराष्ट्र मेरीटाईम बोर्ड ॲक्ट १९९६ च्या अधिन राहून) | जल आलेखक | अर्ज प्राप्त झाल्यापासून एक महिन्याच्या आंत निर्णय प्रक्रिया पूर्ण करावी | मुख्य कार्यकारी अधिकारी | १ महिना |
| १८ | **रेती उत्खननासाठी ना हरकत दाखला**<br><br>इंडियन पोर्ट ॲक्ट १९०८ च्या कलम ३० अन्वये<br>(महाराष्ट्र मेरीटाईम बोर्ड ॲक्ट १९९६ च्या अधिन राहून) | मुख्य कार्यकारी अधिकारी | जिल्हाधिकारी यांच्याकडून विनंती अर्ज प्राप्त झाल्यानंतर दोन आठवडयांच्या आत प्रकरण निकाली काढावे. | महाराष्ट्र मेरीटाईम बोर्ड | १ महिना |
| १९ | **जल आलेखन नकाशा देणे बाबत**<br>(महाराष्ट्र मेरीटाईम बोर्ड ॲक्ट १९९६ च्या अधिन राहून) | जल आलेखक | जल आलेखक यांच्याकडे अर्ज प्राप्त झाल्यानंतर त्यांनी दोन आठवडयाचे आंत प्रकरण निकाली काढावे. | मुख्य कार्यकारी अधिकारी | २ आठवडे |

# तक्रार निवारण अधिकारी

विभागाकडून पुरविण्यात येणा-या सेवा विहीत कालावधीत पुरविल्या न गेल्यास किंवा इतर काही तक्रार असल्यास खालील अधिका-यांना भेटून किंवा पत्राव्दारे संपर्क साधावा.

**मुख्य बंदर अधिकारी**
**महाराष्ट्र मेरीटाईम बोर्ड, मुंबई.**
**इंडियन मर्कन्टाईल चेंबर्स, ३ रा मजला,**
**रामजीभाई कमानी मार्ग,बॅलार्ड इस्टेट**
**मुंबई-४०० ००१**
**दूरवध्वनी क्रमांक २२६१५४५७**
**फॅक्स क्रमांक २२६१ ४३३१**